# विधानसभा निवडणुक आणि राष्ट्रीय संदर्भ

**प्रा. कांबिरे रोहिणी भाऊसाहेब,** राज्यशास्त्र विभाग, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड.

..................................................................................................................................

**प्रस्तावना :—**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताने ब्रिटीशांशी संघर्षमय लढा देवून स्वातंत्र्य मिळवले. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही शासन एकरुप ठेवण्यासाठीसंसदीयलोकशाही प्रणालीचा स्विकार करुन प्रथमत: सार्वत्रिक निवडणुका १९५२ साली घेण्यात आली. त्यानंतर संसदीय शासन प्रणालीनुसार दर पाच वर्षांनी किंवा मुदतपुर्व लोकसभा व विधानसभा निवडणुका घेण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर भौगोलिक, भाषिक, सांस्कृतिक असा कोणताही आधार न घेता एकूण घटक राज्याची निर्मिती केली होती. कालांतराने भौगोलिक भाषिक, सांस्कृतिक याचा आधार न घेता राज्यांची निर्मिती केल्यामुळे अनेक समस्यांना या राज्यांना सामोरे जावे लागत होते. परिणामी भाषांवार प्रांतरचनेची अनेक राज्यामधून मागणी होवू लागली. आणि भारत सरकारने भाषावार प्रांतरचनेसाठी राज्यांना मान्यता दिली व त्या आधारावर अनेक राज्यांची निर्मिती झाली. यामध्ये महाराष्ट्र राज्य हे सुद्धा होते. महाराष्ट्राने मराठी भाषिकांचे राज्य असावे यासाठी संयुक्त महाराष्ट्राचा लढा दिला व १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले.

१९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर महाराष्ट्रात विधानसभेची पहिली निवडणुक १९६२ साली झाली.

सन २०१९ साली महाराष्ट्रात विधानसभेची १४ वी निवडणुक पार पडली. या निवडणुकीमध्ये अनेक सत्ता बदल झालेले आहेत. या सत्ताबदलाचा महाराष्ट्राच्या राजकारणावर बऱ्याच प्रमाणत प्रभाव पडलेला दिसून येतो. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या राष्ट्रीय संदर्भात विचार करत असताना या निवडणुकांचा आणि राष्ट्रीय पातळी वरील राजकारणाचा जवळचा संबंध असल्याचा दिसते. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीवर लोकसभेमध्ये झालेल्या सत्तांतरांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. २०१४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस पक्षांचा दारुन पराभव झाला. आणि भाजपाचा नव्याने राजकारणात उदय झाला. या केंद्रीय राजकारणाचे पडसाद महाराष्ट्राच्या राजकारणावरही पडल्याचे दिसून येते. २०१४ पर्यंत कॉंग्रेस व मित्रपक्षाची प्रदीर्घ सत्ता महाराष्ट्रात होती पण केंद्रीयसत्ता बदलामुळे महाराष्ट्रामध्ये देखील सत्तांतर झाल्याचे दिसते. २०१४ साली झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात भाजपच्या युतीचे सरकार सत्तेवर आले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रामध्ये एकूण २६ सभा घेतल्या होत्या. साहजिकच २०१४ च्या निवडणुकीत केंद्रीय नेतृत्वाचा प्रभाव असल्याचे दिसून आले होते. सन २०१९ रोजी १४ वी विधानसभा पार पडली या १४ व्या विधानसभेवर देखील केंद्रीय म्हणजेच राष्ट्रीय वर्चस्वाचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.

**उद्दिष्टये :—**

१) २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील बदलत्या सत्ता समीकरणांचा अभ्यास करणे.

२) महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीवर केंद्रीय नेतृत्वाचा व हस्तक्षेपाचा पडलेला प्रभावांचा अभ्यास करणे.

३) स्थानिक समीकरणांना बाजूला सारुन राष्ट्रीय समीकरणे कशी गतीशिल झाली याचा आढावा घेणे.

४) महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत निर्माण झालेल्या राजकीय पेचाचा अभ्यास करणे.

५) राष्ट्रीय संदर्भानुसार २०१९ च्या विधानसभा निवडणूकीचा आढावा घेणे.

६) राज्यपातळीवरील व केंद्रीय पातळीवरील नेतृत्वांचा तौलनिक अभ्यास करणे.

**व्याप्ती :—**

प्रस्तुत शोधनिबंधाची व्याप्ती ही महाराष्ट्राच्या राजकारणातील राष्ट्रीय प्रभावाचा किंवा संदर्भाचा अभ्यास करणे ही आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील राष्ट्रीय तसेच केंद्रीय पातळीवरील नेतृत्वाचा, निर्णयाचा सत्तेचा होणारा परिणाम अभ्यासणे महाराष्ट्राची राजकीय समीकरणे बदलण्यामागे राष्ट्रीय पातळीचे असलेल्या योगदानाचा आढावा घेणे व केंद्रीय राजकीय परिस्थितीचा व महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय परिस्थितीचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे व विशेषत: महाराष्ट्रातील

विधानसभेच्या २०१९ च्या निवडणुकीतील केंद्रीय नेतृत्वाचा हस्तक्षेप व महाराष्ट्रातील राजकीय पेच अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :—**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतलेला असून संदर्भ ग्रंथ, पुस्तके, लेख, इंटरनेट, मासिके इत्यादीचा आधार घेवून विश्लेषण करण्याचा प्रयत्न केला आहे.

**विषेय विवेचन:—**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्र्यांची, पक्षांची व केंद्रीय विचारसरणीची जी भूमिका होती ती पुढील मुद्दयांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय नेतृत्वाचा प्रभाव :—**

२०१९ ची विधानसभा निवडणुक ही लक्षवेधी व निर्णायक स्वरुपाची होती, कारण या निवडणुकीत अनेक पक्षांच्या दिग्गज नेत्यांचे भवितव्य पणाला लागले होते. त्यामुळे अनेक केंद्रीय पातळीवरील नेते मंडळींनी आपल्या पक्षाच्या उमेदवाराच्या प्रचारासाठी अनेक सभा घेतल्या. निवडणुकांपूर्वी पक्षांनी आपल्या पक्षांच्या प्रचारार्थ भाजपाने महाजनादेश यात्रा, आदित्य ठाकरेंची जनआर्शिवाद यात्रा, राष्ट्रवादीची शिवस्वराज्य यात्रा, कॉंग्रेसची महापर्दाफाश यात्रा राबवल्या. या प्रचारदौऱ्यांचा देखील प्रभाव महाराष्ट्राच्या राजकारणावर पडल्याचे दिसून येते.

**आघाडयांचे राजकारण आणि राष्ट्रीय संदर्भ :—**

१९७८ पासून महाराष्ट्राच्या राजकारणात आघाडयाच्या राजकारणाच्या प्रयोगाला सुरुवात झाली. कारण आतापर्यंत केंद्रात सत्तेवर असणारा पक्षच राज्यात सत्तेवर येताना दिसत होते. पण १९७८ पासून अनेक राष्ट्रीय पक्षाची सत्ता केंद्रात क्षीण झाली की त्याचे पडसाद महाराष्ट्रात उमटताना दिसतात म्हणून आघाडयांचे राजकारण निर्मितीला देखील राष्ट्रीय संदर्भ कारणीभूत असल्याचे दिसते.

**राष्ट्रीय पक्षांची महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमिका:—**

आज भारतात एकूण ७ राष्ट्रीय राजकीय पक्ष आहेत त्यापैकी राष्ट्रीय कॉंग्रेस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, भारतीय जनता पक्ष यासारखे पक्ष व त्यांची महाराष्ट्राच्या राजकारणातील भूमिका खऱ्या अर्थाने खूप महत्वपूर्ण असल्याचे दिसते. कारण सुरुवातीपासूनच महाराष्ट्राच्या राजकारणात केंद्रीय म्हणजेच राष्ट्रीय पक्षाची भूमिका निर्णायक लक्षवेधी असल्याचे दिसते. हीच परिस्थिती २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आपणास पाहावयास मिळते. त्याचे कारण म्हणजे केंद्रीय सत्ताधाऱ्यांचा राजकारणातील वाढता प्रभाव हेच आहे. २०१९ च्या निवडणुकीत विविध पक्षाच्या ३२३७ उमेदवारांनी निवडणुक लढवली. मात्र जनतेने त्या उमेदवाराला मतदान न करता त्या विशिष्ट पक्षाच्या वैचारिक तत्वप्रणालीला मतदान केल्याचे दिसते. या राष्ट्रीय पक्षाच्या प्रभावामुळे आज महाराष्ट्रातील राजकारणात एक वैचारिक अभिसरण निर्माण झाले आहे.

**विधानसभेसाठीची राजकीय समीकरण:—**

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीत प्रमुख लढत ही कॉंग्रेस — राष्ट्रवादी कॉंग्रेस आघाडी विरुद्ध भाजप — शिवसेना युती अशी असेल असं सध्या दिसत आहे. कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसच समान जागावाटपावर एकमत झालं आहे. एमआयएम पक्षान वंचित बहुजन आघाडीची साथ सोडून स्वतंत्रपणे निवडणुका लढविण्याचा निर्णय घेतला होता. यासारखी अनेक नविन समिकरणे २०१९ च्या विधानसभेत दिसून आली आणि त्याचे पडसाद महाराष्ट्राच्या एकूण राजकारणावर पडल्याचे दिसते. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत सत्ता प्राप्तीसाठीची अनेक नविन समिकरणे मांडत असताना त्याचा प्रभाव हा महाराष्ट्राच्या एकूण राजकारणावर पडल्याचे दिसते. या बदलत्या राजकीय समिकरणावर राष्ट्रीय पातळीवरील राजकारणाचा प्रभाव असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

**सत्तापेच महाराष्ट्राचा पण निर्णय मात्र दिल्लीतून :—**

महाराष्ट्रात जो सत्तेचा पेच निर्माण झाला आहे. त्यामुळे निर्माण झालेली राजकीय अस्थिरता खूपच शिगेला पोहचली आहे. यापरिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी, शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईसाठी सरकार कधी स्थापण होईल याची वाट उभा महाराष्ट्र बघत आहे. सत्ता महाराष्ट्रात स्थापन करावयाची आहे व नेते दिल्लीत बसून निर्णय घेत आहे. महाराष्ट्रात स्थिर सरकार याव यासाठी सेना, कॉंग्रेस, राष्ट्रवादी प्रयत्न करत आहे. यासाठी वारंवार बैठकांचे सत्र सुरु आहे. काही बैठका महाराष्ट्रात वा काही बैठका दिल्लीत सुरु आहे. आधी राष्ट्रवादी — कॉंग्रेस मध्ये चर्चा होईल नंतर कॉंग्रेसच्या

हायकमांड यांना माहिती दिल्या जाईल मग सेना, कॉग्रेस राष्ट्रवादी यांच्यात बैठक होईल नंतर मग काय ते निर्णय घेतला जाईल. हे समिकरण आज आपणास दिसून येत आहे. संसदेचे हिवाळी अधिवेशन असल्याने महत्वाचे सेना, कॉग्रेस, राष्ट्रवादीचे नेते दिल्लीत आहे. त्यामुळे जो काही निर्णय होईल तो दिल्लीतूनच होईल असे एकंदरीत दिसून येते. निर्णय महाराष्ट्राचा पण दिल्लीचे नेते दिल्लीत बसून निर्णय घेईल असे एकंदरीत चित्र निर्माण झाले आहे. सरकार स्थापन करणे असो की आणखी कोणते कारण सगळया पक्षांचे निर्णय दिल्लीतूनच होतात हे निश्चित.

**राज्यपाल आणि केंद्राची भूमिका :—**

महाराष्ट्रात एकूण तीन वेळा राष्ट्रपती राजवटीचा प्रसंग ओढावला आहे. यामध्ये राज्यपालांची भूमिका निर्णायक व लक्षवेधी होती. राज्यपाल हा राष्ट्रपतीचा घटक राज्यातील प्रतिनिधी म्हणून काम करतो. एकंदरीत महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीत कोणत्याच राजकीय पक्षाने बहुमत प्राप्त न केल्यामुळे संपुर्ण सत्ता राष्ट्रपतींच्या हाती गेल्याचे दिसते. या परिस्थिती मागे देखिल राष्ट्रीय राजकारणाचा प्रभाव असल्याचे दिसते. व केंद्रीय दबावतंत्रामुळेच महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू झाल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या राजकारणात भाजपला सत्ते पासून दुर ठेवण्याचा जो प्रयत्न चालला आहे. या पार्श्वभूमिवर केंद्रातील सत्तेचा वापर करुन महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लागू झाली.

**निष्कर्ष :—**

१) २०१९ च्या विधानसभा निवडणुक ही महाराष्ट्राच्या राजकारणातील एक महत्वपूर्ण निवडणुक आहे. या निवडणुकती जी नवनविन समिरणे पुढे आली आहे त्यावर एकूणच राष्ट्रीय राजकारणाचा मोठा प्रभाव असल्याचे दिसते.

२) महाराष्ट्रातील राष्ट्रपती राजवट आणि त्यामागील केंद्राची दडपशाही वृत्तीवर या शोधनिबंधातून प्रकाश टाकला आहे.

३) महाराष्ट्राच्या एकूण राजकारणावर केंद्रसरकारचा वाढता हस्तक्षेप वा त्यातून महाराष्ट्रात निर्माण झालेली पेचात्मक परिस्थिती व त्यातून महाराष्ट्राच्या राजकारणाला मिळालेल्या वेगळया वळणाला केंद्रीय संदर्भ जबाबदार असल्याचे जाणवते.

संदर्भ ग्रंथ :—

१. दै. लोकसत्ता — दिनांक २१ ते २६ ऑक्टोंबर २०१९

२. दै. लोकमत — दिनांक १८ ऑक्टोंबर

३. डॉ. अशोक जैन — 'महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण', प्रथम आवृत्ती, १९९८ सेठ पब्लिकेशन

४. प्रा. बी. बी. पाटील — 'महाराष्ट्र शासन आणि राजकारण', प्रथम आवृत्ती, २००८ फडके प्रकाशन

५. www.Wikipedia.Com

६. दैनिक पुढारी